# राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम
## मार्गदर्शक सूचना

निवडा आयुष्य / नको तंबाखु

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कक्ष

स्वास्थ व कुटुंब कल्याण मंत्रालय,

भारत सरकार – २०१५

**सन २००६-०७ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम सुरु केला त्यांची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.**

१) तंबाखु सेवनाचे हानीकारक परिणामांबाबत जागरुकता निर्माण करणे.
२) तंबाखुचे उत्पादन व पुरवठा नियंत्रित करणे.
३) अंमलबजावणी आणि तंबाखु नियंत्रण व प्रतिबंधन कायद्याच्या तरतुदीची खात्री करणे. सिगारेट व तंबाखुचा वापर याचा प्रसार प्रचारांवर बंदी व व्यापार आणि वाणिज्य, निर्मिती, पुरवठा व वितरण नियम-२००३
४) तंबाखुचा वापर सोडविण्यासाठी मदत करणे.
५) तंबाखुचा प्रतिबंधन आणि तंबाखुचे नियंत्रण कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीची आखणी करणे, जागतिक आरोग्य संघटनेकडून दिल्या गेलेल्या सुचना तसेच तंबाखु नियंत्रणांतर्गत दिल्या गेलेले निर्देश व धोरणांची अंमलबजावणी करणे.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत २०१२ मध्ये मंत्रालय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाव्दारे निर्धारीत केल्या गेलेली कार्यालयीन मार्गदर्शक तत्वे ही राज्यसरकार आणि जिल्हा प्रशासकांना मार्गदर्शिका म्हणून उपलब्ध करुन देण्यात आल्या तसेच हया कार्यान्वित मार्गदर्शक सूचना राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर कार्यरत आहेत त्यांना राष्ट्राच्या तंबाखु नियंत्रण ध्येयाकरीता देण्यात आल्यात.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत NTCP कार्यक्रामांतर्गत राज्यस्तरावर व जिल्हापातळीवर काही कार्यात अुनदानामध्ये बदल करण्यात आले. भागधारकांच्या अभिप्रायानूसार सर्व जिल्हयामध्ये टप्प्याटप्प्याने हा राष्ट्रीय कार्यक्रम सुरु करण्याचे विचाराधीन होते.

जिल्हास्तरावर व उपजिल्हा स्तरावर हा कार्यक्रम अंतर्भूत करण्यासाठी एकत्रितपणे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविणे व आरोग्य सुविधा देण्याच्या समन्वयासाठी.

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाची मुख्य गरज

१) आरोग्य व सामाजिक कार्यकर्ता, स्वयंसेवी संस्था, शाळेचे शिक्षक आणि अंमलबजावणी अधिकारी यांचे प्रशिक्षण घेणे.
२) प्रचार, प्रसार, शिक्षण व संदेशाची कार्यवाही
३) सांकेतिक कार्यक्रम
४) तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांच्या नियमांचे संनियंत्रण देखरेख करणे.
५) पंचायत राज संस्था व गावपातळीवरील कार्यक्रमाचे समन्वय साधणे.
६) स्वरुपाच्या प्रतिबंधासाठी व बळकटीकरण करणे त्यात जिल्हास्तरावर औषधोपचाराची सोय करणे.

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांतर्गत निषेध गट हा तंबाखु प्रतिबंधासाठी देण्यात येणाऱ्या सेवांवर देण्यात येत आहे.

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांतर्गत उपलब्ध सोयी संधी हया सुध्दा पहाव्यात.

तंबाखु नियंत्रण व इतर आरोग्य विषयक कार्यक्रमांमध्ये हस्तक्षेप करुन उपलब्ध संधींचा राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमात फायदा घ्यावा. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत NTCP विशेषतः प्रयत्नांची पराकाष्टा करीत शहरी गरीब, आदिवासी व अल्पसंख्यांक ज्यांना आवश्यकतेपेक्षा कमी आरोग्य सेवा मिळतात, ते तंबाखूपासून तयार केलेले उत्पादनाला किंवा धूररहित तंबाखुजन्य पदार्थांच्या सेवनाला बळी पडतात.

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण (NTCP) कार्यक्रम हा त्रिस्तरीय रचनांमधून राबविला जाईल

१) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष
२) राज्य तंबाखू नियंत्रण कक्ष
३) जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष

विविध असंसर्गजन्य, रोगांच्या कार्यक्रमांतर्गत तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कक्ष

राज्य तंबाखू नियंत्रण कक्ष

राज्य नोडल अधिकारी

राज्य सल्लागार

कायदेशीर सल्लागार

जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

जिल्हा नोडल अधिकारी

जिल्हा सल्लागार

सामाजिक कार्यकर्ते, मानस शास्त्रज्ञ, सल्लागार

राज्य तंबाखू नियंत्रण कक्ष

भूमिका व जबाबदारी :-

प्रत्येक राज्यात/युनियन प्रदेशातील १ तंबाखु नियंत्रण कक्ष (राज्य आरोग्य विभागात) आरोग्य सेवा संचालनालयाचे संचालक हे तंबाखु नियंत्रण कक्ष स्थापनेकरीता संचालनालयात जागा दिल्या जाईल.

राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष हे जबाबदार राहतील. विविध कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करणे त्यासाठी वेगवेगळया कार्य व प्रत्यक्ष काम व आर्थिक ध्येय जे नियोजित केलेले आहेत.

STCC संस्थांव्दारे कामाचे दस्तावेजीकरणामध्ये, राज्य व जिल्हास्तरावर विविध पदांची भरती करणे, बॅंकेमध्ये केलेले काम व आर्थिक अहवाल सादर करण्याची जबाबदारी राहील.

STCC ला, राज्य नोडल अधिकारी जो आरोग्य विभागातील वरीष्ठ सेवानिवृत्त अधिकारी हा पुर्णवेळ कार्यावर असेल जो संसर्गजन्य रोग कार्यक्रमासाठी जबाबदार असेल व हा कक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत राहील NCD Cell व आरोग्य विभागात कार्यरत असेल.

| अ.क्र. | STCC अंतर्गत कार्ये | मंजूर निधी (दरवर्षी) |
|---|---|---|
| १ | अर्हता/पुरस्कार मोहिम | १५.०० |
| २ | भागधारकाचे प्रशिक्षण | ४.०० |
| ३ | फेलक्झीपूल | ५.०० |
| ४ | गमनशिलता सहाय्य (प्रवासखर्च) | २५,००० |
| ५ | आधारभूत मनुष्यबळ (राज्यसल्लागार) | १२.०० |
| ६ | कायदेशीर सल्लागार/आर्थिक सल्लागार | ४८,००० |
| ७ | कार्यालय स्थापनेसाठी एक वेळ अनुदान | १.०० |
|  | **एकूण** | **४०.००** |

राज्यस्तर समन्वय समिती

प्रत्येक राज्यात/युनियन प्रदेश/नी एक राज्यस्तर समन्वयक समिती नेमली ज्याचे मुख्य सचिव हे प्रमुख राहतील अथवा नामनिर्देशन व्यक्ति व प्रमुख सचिव हे सदस्य सचिव राहतील. राज्य नोडल अधिकारी हे STCC च्या सभा आयोजित करतील.

ही समिती तंबाखु नियंत्रण व प्रतिबंधन कायदयानूसार तांखु व तंबाखुजन्य पदार्थांचे निर्मिती कायदाच्या तरतुदीनूसार एकूण अंमलबजावणीसाठी जबाबदार राहील. खालील दिल्याप्रमाणे सुचक यादीनूसार राज्य सरकार यात दुसऱ्या विभागातील व्यक्तिंची निवड गरजेनुसार करु शकते.

STCC यांची भूमिका खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | विभाग प्रतिनिधी | कार्य |
|---|---|---|
| १ | प्रमुख सचिव/आरोग्य सचिव किंवा अभियान संचालक राआअ व सदस्य सचिव | नोडल सचिव<br>कु.क. बैठकी आयोजित करणे, नियमित संनियंत्रण, पुनरावलोकन, देखरेख ठेवणे. |
| २ | प्रधान सचिव (गृह) किंवा नामित सदस्य | राज्य पोलीसांच्या मुख्यांना COTPA अंतर्गत तरतुदींना आदेशित करणे.<br>मासिक गुन्हे पुनरावलोकन सभेत आणि COTPA शी संबंधित तारखा व अहवाल जमा करणे.<br>नियमित COTPA चे पुनरावलोकन व अंमलबजावणी करणे. |
| ३ | प्रधान सचिव/शाळा/ उच्च शिक्षण किंवा नामनिर्देशित यादी | तंबाखुमुक्त शाळेकरीता मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी<br>शाळेची परिसर तंबाखु मुक्त ठेवणे<br>शाळेच्या पाठयक्रमात तंबाखुचे दुष्परिणाम यांचा समावेश करणे.<br>संनियंत्रण व देखरेख ठेवणे (शाळेतील आरोग्य) घटकांवर NTCP |
| ४ | प्रधान सचिव/वित्त सचिव/नामनिर्देशित यादी | प्रशासक म्हणून व तंबाखु उत्पादनांवर कर व तंबाखु उद्योगात बेकायदेशीर व्यापार व कर चुवकेपणावर लक्ष ठेवणे व ते कमी करण्याचा प्रयत्न करणे. |
| ५ | मुख्य सचिव/ग्रामिण विकास | बीडी कामगार व इतर संबंधित व्यक्तिंचे वैकल्पिक उपजिविकेचे साधन तयार करणे. |
| ६ | सचिव कामगार/कामगार आयुक्त/नामनिर्देशित व्यक्ति | तंबाखु जन्य पदार्थांच्या नोंदणीकृत कारखान्यात आरोग्यासंबंधी हानीकारक म्हणून धोका यांचे नियमन धोक्याचा इशारा लिहिलेला आहे किंवा नाही याची खात्री करणे.<br>आरोग्य विभागाच्या समन्वयाने बीडी कामगारांना आरोग्य संबंधित धोक्याचे संवेदीकरण करणे.<br>बिडी कामगारांच्या पेशासंबंधि प्रशिक्षणातून इतर उपजिविकेची संधी निर्माण करणे व |

| | | |
|---|---|---|
| | | अंमलबजावणी करणे. |
| ७ | सचिव, वाहतुक आयुक्त किंवा नामनिर्देशित व्यक्ति | COTPA अंतर्गत सर्व सार्वजनिक वाहतुक वाहनामध्ये धुम्रपानास बंदी लागू करावी.<br>बस स्टॅन्ड बसटिकीटे व बसांमध्ये कोणत्याही प्रकारचे परीस्थितीत अपरोक्ष रितीने, तंबाखूजन्य पदार्थांची सेवनासाठी जाहिरात लावण्यात येऊ नये, अथवा त्याचा उदा. गुटखा, पान मसाला इ. वापर करण्यात येऊ नये.<br>तंबाखु विरोधी संदेश हा वाहतुक विभागाने बसवर, स्टॅन्डवर व बसतिकीटांवर लिहावा अथवा प्रदर्शित करावे. |
| ८ | रेल्वेविभागातील नामनिर्देशित व्यक्ति | COTPA अंतर्गत असणाऱ्या तरतुदींची अंमलबजावणी ही रेल्वेविभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व ठिकाणी प्रशासकीय संस्थांमध्ये व्हावी उदा.धुम्रपानास बंदी, जाहिरातीची बंदी तसेच तंबाखूजन्य पदार्थाची विक्री व खरेदी अल्पवयीन व्यक्तिनी करु नये.<br>तंबाखूजन्य पदार्थ उदा.गुटखा, पानमसाला व इतर तंबाखुजन्य उत्पादने यांच्या विक्रीला ट्रेनमध्ये व स्थानकांवर विक्रीची बंदी असावी.<br>तंबाखुविरोधी संदेश प्रदर्शित करणे उदा. रेल्वे पॅनलवर, स्थानकांवर, रेल्वेटिकीटांवर व परिसरात इ. |
| ९ | सचिवकृषी अथवा नामनिर्देर्शित व्यक्ति | तंबाखु पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना इतर पर्यायी कोणतेही उत्पादन करणाऱ्या पिक उत्पादनांसाठी योजना तयार करणे.<br>शेतकऱ्यांमध्ये तंबाखु उत्पादनांचे धोके व त्यांचा वापर याच्या धोक्याविषयी जागरुकता निर्माण करावी. |
| १० | जनसंपर्क सचिव/माहिती प्रसिध्दी किंवा त्यांचे नामनिर्देशित व्यक्ति | तंबाखुविषयीच्या धोक्याबद्दल राज्यव्यापी जागरुकता अभियान किंवा तंबाखुमुळे होणारे दुष्परिणाम याबद्दल COTAP च्या तरतुदींनूसार जागरुकता निर्माण करणे.<br>स्थानिक भाषेतील प्रशिक्षण साहित्य तयार करणे व ते प्रदर्शित करणे स्थानिक कार्यक्रमात, आरोग्य मेळावा व राज्य माहिती |

| | | |
|---|---|---|
| | | शिक्षण व संप्रेषण (i.e.c.) अभियान इ.<br>त्बाखु विरोधी जनजागृती, i.e.c. साहित्य तयार करणे व ती जुळवून घेण्याची प्रक्रिया किंवा त्याचा परिणाम, मोहिम, साहित्य प्रदर्शित करणे व त्याचा प्रसार करणे. मेळाव्यामध्ये स्थानिक कार्यक्रमामध्ये तसेच राज्य / जिल्हा स्तरावर i.e.c. मोहिम राबविणे. |
| ११ | नागरी सामाजिक संस्था/ आरोग्याबद्दल कार्य करणे तंबाखु नियंत्रण नामनिर्देशित व्यक्ति | त्यांच्या इतर कार्यक्रमात तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाचा सहभाग करावा.<br>तंबाखु नियंत्रण कायदयाचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकारी/समितीला कळवावे.<br>राज्य शासनाच्या / स्थानिक सरकारच्या तंबाखु विरोधी अभियानात सहयोग करावा.<br>समाजाशी व CBO पंचायतराज समिती व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचेसोबत समन्वय साधून तंबाखुविरोधी जनजागरण करण्याकरीता COPTA मध्ये असलेल्या तरतुदी व अंमलबजावणी करावी. |
| १२ | जिल्हाधिकारी/जिल्हा न्यायाधिश जिल्हयाचे किंवा नामनिर्देशित व्यक्ति | हे जिल्हयाच्या प्रशासनाशी निगडीत व्यक्ति COTPA अंतर्गत असलेल्या तरतुदींची अंमलबजावणी जिल्हास्तरावर करुन राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम अंमलबजावणी करतील. |
| १३ | कायदा सचिव किंवा नामनिर्देशित व्यक्ति | राज्यातील समितीला कायदा विषयक सल्ला देतील COTPA च्या अंमलबजावणीसाठी व कोर्टसंबंधी केसबाबत कायदेशीर कार्यवाही करतील. |
| १४ | पंचायतराज सचिव किंवा नामनिर्देशित व्यक्ति | COTPA च्या अंमलबजावणीसाठी ३ निर्वाचित पंचायतराज समिती मार्फत ग्रामीण भागात मदत करतील.<br>ते तंबाखु नियंत्रण धोरणाच्या बाबतीत इतर आरोग्य व विकासात्मक कार्यक्रमातील एककेंद्राभिमुखता विषयी सोय करतील. |

अनु क्र.१, ५ ते ९ हे तंबाखु व बिडी कामगार ज्या जिल्हयात आहेत त्यांना लागू आहे.

..........................................

राज्यस्तरावर लहानलहान गटकार्यासाठी मुख्य विभागतून काही निवडक व्यक्तिंची निवड करण्यात येते. ते नियमितपणे SCCE ला संलग्नित ठेवण्याकरीता मदत करतील. त्याची गटकार्यकार्याची मासिक सभा होतील व STCC मध्ये प्रत्येक तिमाहीत केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येईल.

२. राज्य तंबाखु नियंत्रण कक्षांच्या उपक्रम STCC चे मुख्य उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

२.१ संबंधित भागधारकांचे प्रशिक्षण व त्यांची क्षमताबांधणी

२.१.१ उद्‌देशित प्रशिक्षणार्थी

राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष ही विविध तंबाखु नियंत्रणावरील शासकिय दृष्टीकोन लक्षात घेऊन विविध भागधारकांचे प्रशिक्षण घेतील. राज्य स्तरावरील पुरस्कृत कार्यशाळा/संवेदीकरण कार्यक्रम झाले पाहिजे. प्रत्येक राज्य शासनातील सर्व विभागांना तंबाखू नियंत्रण कार्यक्रमात समावेश करावे. विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण हे पोलीस, आरोग्य विभाग, मेडिकल प्रोफेशनल्स, नामनिर्देशनांसाठी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी, वैद्यकिय व्यवसायी, विद्यार्थी, प्रसारमाध्यमे, लोक, शिक्षणतज्ञ इ. जनतेस विशिष्ट प्रशिक्षण/मार्गदर्शन देतील त्यांनी समाजसेवी संस्थांशी जवळीक साधून त्यांना कायदेशीर सल्ला मिळेल अशी कार्यशाळा घ्यावी.

STCC करीता राज्यशासनाने प्रशिक्षकांचे प्रशिक्षण ही आयोजित करावे. जिल्हा संस्था व सदस्यांच्या नियुक्त्या कार्यक्रमांची व त्यानंतर त्यांचा नियमित अंतरभाव करावा.

राज्यस्तरीय तंबाखु नियंत्रण कक्षासाठी खालील काही सुचविलेले प्रशिक्षण कार्यवाही.

१. राज्यस्तरावर कायदेविषयक माहितीसाठी कार्यशाळा घ्यावी.
२. राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम (NTCP) अंतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम – जिल्हा प्रशिक्षण केंद्राकरीता कर्मचारी भरती करणे.
३. DTCE कर्मचाऱ्यांकरीता उजळणी प्रशिक्षण घेणे.
४. आरोग्य सेवा देणाऱ्यांना तंबाखु वापर कमी करण्याबाबतीत प्रशिक्षण देणे/तंबाखुचे दुष्परिणाम
५. कायदा अंमलात आणण्याकरीता प्रशिक्षण/संवेदनशिलता निर्माण करण्याकरीता कार्यक्रम घेणे.
६. इतर काही प्रशिक्षणे जे तंबाखु नियंत्रण कार्यक्रम कायदा (COTPA) च्या अंमलबजावणीकरीता आवश्यक आहेत व जागतिक आरोग्य संघटना PCTC ची

अंमलबजावणी करीता आवश्यक आहे. प्रशिक्षण हे नियमित व प्रत्येक तिमाहीत आयोजित करण्यात यावे.

हे प्रशिक्षण इतर आरोग्य कार्यक्रमाशी उदा NPCDS, RNTCP व इतर कार्यक्रमाशी निगडीत करावे यासाठी प्रयत्न करावे.

राज्यस्तरावरील प्रशिक्षण/कार्यशाळा आयोजित करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मानकांनूसार वरील प्रशिक्षण घेण्यात यावे.

२.१.२ प्रशिक्षण घेण्यासाठी संस्थांची निवड – प्रशिक्षणाची निकड बघता व कार्यक्रमाची व्यापकता लक्षात घेता राज्य SIHFW किंवा इतर एखाद्या मानांकित संस्था निवडू शकते. राज्यातील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्थांमध्ये राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमा (NTCP) चे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. तसेच राज्यांनी इतर मानांकित संस्था प्रशिक्षणासाठी वरील प्रशिक्षणांसाठी निवड करावी.

२.१.३ प्रशिक्षण पुस्तिका :– मुख्यत्वे विषयांची निवड जे प्रशिक्षणासाठी आवश्यक आहेत त्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या तरतुदी व प्रस्तावना. तंबाखू नियंत्रणाचा कायदा तंबाखुचा प्रकार व उत्पादने, वापरावर बंदी, आरोग्यावर तंबाखुच्या वापराचे दुष्परिणाम तंबाखुचे सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम, राज्यस्तरावर समाजाची व इतर भागीधारकांचा सहभाग व जबाबदारी इ.

प्रशिक्षणार्थ्यांना सद्यास्थितीत उपलब्ध प्रशिक्षण पुस्तिका देण्यात यावी व इतर आवश्यक साहित्य ही उपलब्ध करुन द्यावेत. जे NTCC सोबत उपलब्ध आहेत.

१. प्रशिक्षण पुस्तिका – कर्मचाऱ्यांसाठी
२. प्रशिक्षण पुस्तिका – आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी
३. प्रशिक्षण पुस्तिका – शिक्षकांकरीता
४. राष्ट्रीय तंबाखू व्यसनाचे उपचार माहिती पुस्तिका
५. COTPA च्या अंमलबजावणीची माहिती पुस्तिका

ही माहिती आरोग्य कर्मचाऱ्यांकरीता प्रादेशिक भाषेत आवश्यकतेनुसार तयार करावी.

२.१.४ प्रशिक्षणासाठी आवश्यक तज्ञमंडळी प्रशिक्षण सत्राकरीता त्यांची दक्षता व स्कील नुसार त्यांची निवड करावी. राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून प्रशिक्षण घेण्यात यावे. ही स्थानिक स्थळावर असणारे तज्ञ उदा.शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, व्यवस्थापन संस्था किंवा व्यक्तिशः तज्ञ व सामाजिक संस्थेतील तज्ञ व्यक्ति असावेत.

२.३ IEC/ कायदेसंबंधित मोहिम :-

आरोग्य संवाद

२.३ :- राज्यस्तरावर माहिती शिक्षण व समुपदेशन I.e.c. मोहिमेत तंबाखु नियंत्रणाचा समावेश करावा.

I.e.c. संसाधनाने NTCC यांनी नियंत्रित केलेले आहे. तेच स्थानिक पातळीवर जागरुकता निर्माण करण्याकरीता वापरता येईल. इलेक्ट्रॉनिक, छपाई केलेले, परंपरेनुसार, लोकप्रसार माध्यमे इ.बील बोर्डस, हस्तपत्रके, पोस्टर्स, रोड शो, स्थानिक केबल वाहिनी, मोबाईल एग्झिबेशन किट व आरोग्य मेळावा, स्थानिक उत्सवात भाग घेणे, प्रयत्न हा सुध्दा करावा की, i.e.c. संसाधने NTCP अंतर्गत जे राज्य आरोग्य i.e.c. संसाधनाने आहेत राआअ अंतर्गत CDS,

NPD/RNTCP किंवा इतर सारखेच आरोग्य कार्यक्रम

प्रत्येक वर्षाला - १-२ मौखिक आरोग्य या राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मोहिमेशी समन्वयाने घ्याव्यात.उदा.राष्ट्रीय, राज्यस्तर व स्थानिक माध्यमातून मोहिमांचे समन्वय साधून दोन्ही गोष्टी वेळ व संदेश घेण्यात यावा जेणेकरुन जास्त कायदा व परिणाम मिळू शकेल. उदाहरणार्थ रेडिओ जे सर्वात जास्त प्रभावी माध्यम आहे. ते राष्ट्रीय मोहिम राबविण्यासाठी राज्यस्तरवरही कार्यकारक आहे. (राष्ट्रीय जनसंपर्क, मौखिक त्याच्याशी समन्वय साधून चांगले फायदे होतील.

राज्यस्तरावर हे सुध्दा सांगितल्या गेलेले आहे की, जी i.e.c. NTCC राआअ आदेशाकरीता देण्यात आलेली आहे. त्याचा सुध्दा वापर करावा.

साधन साहित्य जे राष्ट्रीय व राज्यस्तरावर माध्यम मोहिम राबविली गेली आहे ती व पुन्हा कम्युनिटी रेडिओ जेव्हाकधी ते जागरुकता मोहिमेत वापरल्या जाते.

राज्यस्तरावर बोर्डचा वापर लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याकरीता (PS COTPA 2003) लोक जागरुकता मोहिम ही कार्पेरेट प्रायव्हेट कंपनीच्या सहभागाने करावी. जी कंपनीची सामाजिक जबाबदारी आहे. (कंपनी नियमाचे Act २०१४ व नियम तयार केलेले)

स्थानिक समस्या व आव्हाने जी तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत मोहिमेत येतात त्याचे हायलाईट करण्यात यावे.

२.४ राज्यस्तरावर असलेला फ्लेग्झीपूल चा वापर राज्यशासन हे राज्य तंबाखू नियंत्रण कक्षाच्या ॲक्टीव्हीटीज साठी फ्लेग्झीपूल चा अनुदान राज्यामधून खर्च करु शकतत. त्यांच्या

आवश्यकतेनूसार एच आर सपोर्ट (कार्यक्रम सहाय्यक व डाटा एन्ट्री ऑपरेटर) राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष इ.साठी.

२.५ तंबाखू नियंत्रण कार्यक्रम उपक्रम व इतर आरोग्य कार्यक्रम यांचे एकत्रीकरण तंबाखु नियंत्रण कार्यक्रम हा गैर संसर्गजन्य आजार कार्यक्रमांतर्गत कॅन्सरचे नियंत्रण व प्रतिबंधन, मधुमेह, CVS आणि स्ट्रोक राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम (राष्ट्रीय कार्यक्रम) वयोवृध्दांकरीता आरोग्य सुविधा, मुखआरोग्य, व्यसनमुक्तता कार्यक्रम व सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम हे राआअ राज्य स्तरावर एक छत्राखाली राबविण्यात येतात.

राज्यस्तरावरील चमुने इतर कार्यक्रमाच्या चमूतील सदस्यांशी सहयोग व सहकार्य करावे.

२.६ तंबाखु नियंत्रण कायद्याची अंमलबजावणीचे संनियंत्रण करावे.

## राष्ट्रीय तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ नियमन / नियंत्रण

राज्य तंबाखू नियंत्रण कक्षाकडून COTPA 2003 च्या (Control of tobacco prevention Act 2003) कायद्याचे संनियंत्रण व अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) हया आव्हानात्मक कार्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य व गृहखात्याकडून राज्यस्तरावरुन चालान फॉर्मची छपाई करणे व सर्व संबंधित अधिकारी वर्गांना त्यांचे वाटपकरुन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

२) COTPA च्या अंमलबजावणीसाठी संस्थास्तरावर वेगवेगळया पध्दतीने अंमलबजावणी करावी जसे -

- मासिक सभा किंवा जिल्हास्तरावर पोलीस विभागाकडून होणाऱ्या गुन्हेगारीबाबतच्या आढावा सभा मध्ये माहिती घेणे व त्यानुसार योग्यती कार्यवाही करणे.
- विविध परवाना (लायसंस) जसे खाद्यपदार्थ विक्री करणारे, विविध दुकानदार इ. कडे ठिकाणी परवाना आहे किंवा नाही याची पडताळणी करुन त्यानुषंगाने यथोचित कार्यवाही करणे.
- COTPA अंतर्गत करावयाच्या पुर्तता, तसेच अटी, शर्ती, विविध टेंडर्स, जाहिराती ई. ची पुर्तता किंवा आवश्यक / योग्य कार्यवाही करणे / बसेसवर तंबाखू सेवन टाळण्यास विविध जाहिराती देणे.
- विविध विभागांत होणारे नियमित प्रशिक्षणामध्ये तंबाखूचे दुष्परीणाम व त्यामुळे होणारे कर्करोगासारखे आजारांबाबत माहिती देणे. पोलिस प्रशिक्षण केंद्र, विविध

शैक्षणिक संस्था, विविध मजुर गट, स्त्री आणि बाल विकास विभाग, ग्राम विकास विभाग, यांचे सहकार्याने जागृती निर्माण करणे. ई.

३) अल्प वयीन बालकांना तंबाखू किंवा तंबाखू जन्य पदार्थाची विक्री होत नसल्याची खात्री करावी. तसेच सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान, शैक्षणिक संस्थाचे परीसरात तंबाखू व तंबाखू जन्य पदार्थाची विक्री करुन नये तसेच या अशा सर्व ठिकाणी तंबाखू जन्य पदार्थांपासून होणारे दुष्परीणामाबाबतचे विविध बोर्ड शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे लावण्यात यावेत.

४) गृहविभाग, शिक्षणविभाग व अन्य विभागांनी देखील परीणामकारक अंमलबजावणीसाठी संनियंत्रण करणे गरजेचे आहे. त्यासाठी अचूक माहिति मिळविण्यासाठी योग्य ती कार्यपध्दती विकसित करावी व त्यानुसार नियमित आढावा घ्यावा.

राज्यस्तरावरुन देखील राज्यातील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले अहवाल तसेच हेल्पलाईन कडून प्राप्तझालेली माहिती, अहवाल ई. ची माहिती/अहवाल नियमितपणे संकलीत करण्यात यावी.

## २.७ STCC साठी लागणारे मनुष्यबळ

राज्यस्तरावर यासाठी दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल. ते राज्यस्तरावरील नोडल ऑफीसरला मदत करतील सदर दोन व्यक्ती म्हणजे - (To Rs are at Annexure 1 & 2)

१) राज्यस्तरीय कन्सल्टंट - १

२) लिगल कन्सल्टंट (कायदा सल्लागार) - १ / किंवा अर्थ विषयक सल्लागार हयापैकी एक

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्षाकडून राष्ट्रीय तसेच राज्य तंबाखू नियंत्रण कक्षातील अधिकारी कर्मचारी यांना राष्ट्रीय किंवा राज्य / विभागीय स्तरावर प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच या अधिकारी / कर्मचाऱ्यांना देखील आरोग्य व कुटुंब कल्याण (MOHFW) मंत्रालया मार्फत आयोजित विविध सभा, प्रशिक्षणात सहभागी करुन घ्यावे. नियंत्रणासाठी कार्य करणाऱ्या अन्य विविध संस्थाना होणाऱ्या सभा किंवा प्रशिक्षणांमध्ये सहभागी करुन घ्यावे.

राज्य समन्वयकाव्यतिरिक्त आणखी एक समन्वयकाची गरजेनुसार नियुक्ती NTCP मध्ये करता येऊ शकते. राज्य किंवा / युनायटेड टेरीटरीज (UT) यांना त्यांचे आवश्यकतेनुसार आर्थिक किंवा कायदा विषयक सल्लागार या पैकी एकाची नियुक्ती करता येते.

हे कंत्राटी पद असून या पदाकरीता रु.४५०००/- फक्त दरमहा मानधन देण्यात येते.

## २.७ STCC ची भूमिका व जवाबदाऱ्या –

खालील प्रमाणे भूमिका व जवाबदाऱ्या या फक्त सूचक किंवा दिशानिर्देशक आहेत.

१) राज्य किंवा जिल्हा स्तरावर विविध कार्याची अंमलबजावणी, पर्यवेक्षणं आणि संनियंत्रण.

२) राज्य व जिल्हास्तरावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे. सर्वच राज्य व जिल्हा स्तरीय तंबाखू नियंत्रण कक्षामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे.

३) तंबाखूच्या दुष्परीणामावर आधारित आरोग्य विषयक काळजी घेणाऱ्या तसेच तंबाखू सेवनाचे दुष्परीणामाबाबत जागरुकता निर्माण करण्याऱ्या संस्थांची स्थापना करणे.

४) तंबाखू सेवन करणाऱ्यासाठी राज्यपातळीपासून तर ग्रामपातळीपर्यंत तंबाखूच्या दूष्परीणामांची माहिती जनतेला करुन देण.

५) तंबाखू चे दुष्परीणामाबाबतची शासन स्तरावरील माहिती सर्व स्तरावर उपलब्ध करुन देणे तसेच शासन स्तरावरील तत्संबंधित सर्व माहिती जनतेस देणे, तसेच जिल्हयात चांगल्या सवयींचा प्रचार प्रसार करणे.

६) तंबाखू व तंबाखूजन्य उत्पादनांचे संनियंत्रण कायद्ये व अंमलबजावणी करणे( Enforcement of COTPA ):-

तंबाखूजन्य उत्पादनांच्या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

- तंबाखू उत्पादनांचे संनियंत्रण
- शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर संबंधित कायदा व नियमांचे बाबतीत सविस्तर माहिती देण्यात यावी. तसेच सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये सुसंवाद व समन्वय असणे आवश्यक आहे. प्रामुख्याने सदर कायद्याच्या अंमलबजावणीची मुख्य जवाबदारी असणाऱ्यांशी समन्वय ठेवून प्रभाविपणे कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी.
- यासाठी लागणाऱ्या चालान, पावती बुक आणि रिसिप्ट बुक ई. जिल्हयातील सर्व संबंधीत अधिकाऱ्यांकडे देण्यात याव्यात. तसेच चालानमुळे शासनाला प्राप्त झालेला रेव्हेन्युचा उपयोग योग्य त्या पध्दतीचा अवलंब करुन तंबाखू व तत्सम पदार्थांच्या प्रतिबंधात्मक कार्यवाही / जनजागृतीसाठी ई. साठी करण्यात यावा.
- राज्य पातळीवर यासाठी समन्वय समीतीची (SLCC) स्थापना करुन त्यांच्या नियमित बैठका घेण्यात याव्या.
- COTPA च्या अंमलबजावणीसाठी नियमितपणे सार्वजनिक ठिकाणे (Public conveyances) सार्वजनिक स्थळ, सुविधा केंद्र, विक्रीची ई. ठिकाणी भेटी देऊन COTPA बाबत योग्यती कार्यवाही करावी.

७) NTCC कडून तयार करण्यात आलेले IEC मॉडयुलचे सर्व जिल्हयामध्ये वाटप करुन ते योग्य ठिकाणी लावावे.

८) अशासकिय संस्था नेहरु युवा केंद्र संगठन, राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय कॅडेट कॉर्पस (NCC) इंडियन मेडिकल असोसिएशन, डेंटल असोसिएशन, रोटरी इंटरनॅशनल, सेल्फ हेल्प ग्रुप्स (SHGS) ई. ची जनजागृती निर्माण करण्यासाठी मदत घ्यावी.

९) कृषी विभाग, समाजकल्याण विभाग, ग्रामविकास खाते, मजुर संघटन व अन्य भागधारक (स्टेकहोल्डर्स) मध्ये जागृती निर्माण करावी.

तंबाखू व तंबाखू जन्य पदार्थांची उत्पादन व निर्मितीच कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच तंबाखूजन्य पदार्थांची निर्मिती करणारे, किंवा बीडी तयार करण्याऱ्यांमजुरांना पर्यायी कामे देण्यात यावीत.

१०) अर्थ विभाग, करवसुली विभाग ई.नी तंबाखू वरील करामध्ये वाढ करावी तसेच शिक्षण विभागाचे मदतीने तरुण वयातील मुले तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन धुम्रपान ई. कडे प्रवृत्त होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

११) राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कक्ष (NTCC) कडे नियमित अहवाल जातो आहे याची खात्री करावी. तसेच जिल्हयाकडून वेळेत अहवाल पोहचतील तसेच झालेल्या खर्चाचे SOE/UC वेळेत पोहचतील याची खात्री करावी. पुढील निधी मिळण्यासाठी SOE/UC वेळीच द्याव्यात.

१२) राज्यपातळीवरुन आरोग्य, आदिवासी किंवा ग्रामीण विकास ई. विभागांनी एकत्रीत पणे राज्यपातळीवर कार्यक्रम घ्यावेत. तसेच तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन व त्यांचे दुष्परीणाम या बाबत असलेले विविध, उत्कृष्ट परिणामकारक डॉक्युमेंटरीचे अन्य विभागांमध्ये देखील शेअर करुन व त्यांवर चर्चा घडवून आणाव्यात. राज्यपातळीवरुन ते अन्य राज्यांना देखील शेअर करता येतिल.

१३) राज्य तंबाखू संनियंत्रण विभागाकडून ते राष्ट्रीय पातळीवर मंत्रालय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाकडे दर तिन महिन्याने (Quarterly) अहवाल पाठवावेत. तसेच सदर अहवालासाठी प्रपत्र ३ (Annexure – 3) चा वापर करावा.

पान नं.११

## २.९ आर्थिक मार्गदर्शक सूचना

राज्यस्तरावरील NTCP च्या कार्यक्रमांसाठी केंद्रशासनाकडून १००% निधी प्राप्त होतो. MOHFW कडून हा निधी राज्य सरकारला विविध कार्यासाठी दिल्या जातो. राज्यातील प्रस्थापित यंत्रणेमार्फत तो विविध कार्यासाठी दिलेल्या निर्देशानुसार खर्च केल्या जातो.

राज्य पातळीवर १०% निधी एका कार्यक्रमाकडून दुसऱ्या कार्यक्रमासाठी वळता करण्याची परवानगी असते किंवा तशी परवानगी घेऊन तो वळता करता येऊ शकतो. तथापि यासाठी

प्राप्त अनुदान हे मंजूर हेड ऐवजी दुसऱ्या हेड मधून खर्च होत असेल तर, त्याची MOHFW कडून पूर्व परवानगी घेणे अनिवार्य असते.

प्रत्येक राज्याने त्यांना देण्यात आलेल्या पैकी किमान ७५% निधी खर्च केलेला असेल तरच पुढील निधी साठी ते मागणी करु शकतात. तसेच पुढील निधीच्या मागणी साठी त्यांना खर्चीत निधीच्या एसओई/युसी देखील द्यावयाच्या असतात.

एसओई/युसी (प्राप्त निधीच्या खर्चाचे प्रमाणपत्र) देणे आवश्यक असते. त्याशिवाय पुढील अनुदान दिल्या जात नाही. खर्चाचा तपशिल आणि उपयोगिता प्रमाणपत्रासाठी दोन वेगवेगळे नमुने (प्रपत्र-४) मध्ये दिले आहेत.

प्रपत्र -१ अटी आणि संदर्भ (Terms of reference (TOR))

राज्य सल्लागार, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम (State consultant & NTCP)

राज्य समन्वयक - राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम (NTCP)

शैक्षणिक पात्रता - मान्यता प्राप्त विद्यापिठातून सार्वजनिक आरोग्य किंवा सोशल सायंस किंवा व्यवस्थापन, सामाजिक विज्ञान मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम झालेले असावे. किंवा एमबीबीएस/बीडीएस उत्तीर्ण व किमान ३ वर्षाचा अनुभव असलेले इच्छुक

अ) किमान ३-५ वर्ष आरोग्य क्षेत्रातील कामाचा अनुभव असलेले

ब) राष्ट्रीय किंवा राज्यपातळीवरील शासकीय कामाचा अनुभव असलेले

क) तंबाखु नियमन/नियंत्रण कार्याचा अनुभव असलेले तसेच अंतर्राष्ट्रीय/राष्ट्रीय पातळीवरील तंबाखु नियंत्रण/नियमन पॉलीसीज आणि आरोग्य कार्यक्रमाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

**ज्ञान आणि कौशल्य :**

- तांत्रिक दृष्टया व आरोग्य विषयक कार्यात पारंगत असलेले, स्थानिक स्तरावर नियोजन करणे, समन्वयाने व परीणामकारक कार्य करणारे, वेगवेगळया वातावरणात/परिस्थितीत कुशलतेने कार्य करणारे

- शोध तज्ञ, गुणवत्तापुर्ण तसेच संख्यात्मक कार्याची माहिती संकलन करुन त्यानुसार निष्पन्नता दर्शविणारे
- दैनंदिन कार्यालयात नाविन्यपूर्ण विचारसरणी किंवा कृती वापरुन कार्य करणारे.
- एकत्रितपणे काम करण्याची क्षमता असणारे, तसेच विविध वातावरणात/परिस्थितीत देखील कार्य करणारे.
- संबंधित स्टेकहोल्डर्स, नागरी संस्था किंवा अन्य एजंसीजला कार्यक्रमाची गरज/आवश्यकता पटवून देऊ शकणारे
- सातत्याने प्रवास करण्याची क्षमता व इच्छा असलेले.
- व्यक्तिगत सुसंवाद, व्यवस्थापन कौशल्य, दिलेल्या मर्यादित कालावधीत/वातावरणात कार्य संपन्न करण्याची क्षमता असलेले.
- च्मुबांधणी व एकत्रित कार्य करण्याची क्षमता असलेले
- एमएस ऑफीस, इंटरनेट वापराची पूर्ण माहिती असलेले
- इंग्रजी/हिंदी भाषेवर प्रभुत्व व संवाद कौशल्य असलेले.

**राज्य किंवा जिल्हास्तरीय कार्यक्रमाकरीता महत्वाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य –**

- तांत्रिक तसेच कार्यक्रमाच्या व्यवस्थापनाकरीता सहाय्य करणे, नियोजन आणि अंमलबजावणी करणे.
- तंबाखु नियंत्रण कार्यासाठी राज्य व जिल्हास्तरावरील तंबाखु नियंत्रण कक्षाला त्याचे अंमलबजावणीसाठी कायदेशीर सल्ला देणे व त्याची अंमलबजावणी करणे.
- प्रशिक्षणाव्दारे जागृती तसेच नागरी वसाहती, सोसायटीमध्ये आवश्यकतेप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करणे, राज्यपातळीवरील अधिकारी, मेडिया आरोग्य संबंधित व्यावसायीक डॉक्टर्स (राज्य व जिल्हापातळीवरील)

**राष्ट्रीय तंबाखु नियमन कार्यक्रमांचे परिणामकारक अंमलबजावणीसाठी**

- कामाची गुणवत्ता तसेच मासिक कार्याचा अहवाल राज्य व जिल्हापातळीवरील तंबाखु नियंत्रण कक्षाला नियमित आणि वेळेवर पोहचत असल्याची खात्री करणे.
- त्रैमासिक आणि वार्षिक अहवाल तयार करण्यास मदत करणे.

- पर्यवेक्षकांनी दिलेल्या अन्य जबाबदाऱ्या आणि कार्य वेळेत पूर्ण करणे.

एकूण संख्या – प्रत्येक राज्यात एक
मसिक मोबदला – रु.५५,०००/- फक्त तसेच
गुणवत्ता/अनुभवाचे आधारे वार्षिक पगारवाढ
नियुक्ती कालावधी – १ वर्षाकरीता
वार्षिक कामाचे मुल्यमापन पुढे वाढविता येईल.
कामाचे ठिकाण (कार्यस्थळ) –STCC राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष
उदा.राज्यस्तरीय नोडल ऑफीसर – तंबाखु नियंत्रण कार्यक्रम आरोग्य विभाग, संचालनालय, मुंबई

**कायदा सल्लागार – राज्य**

किमान शैक्षणिक पात्रता – मान्यता प्राप्त विद्यापीठाची कायदेविषयक डिग्री असणे अनिवार्य

अन्य अपेक्षा – २-३ वर्षाचा जिल्हा न्यायालय/हायकोर्ट/सुप्रीम कोर्ट येथील कामाचा अनुभव

ज्ञान आणि कौशल्य

अ) मल्टी डिसीप्लीनरी कार्यक्षेत्रात समुहाने एकत्रितपणे आणि सकारात्मक कार्य करण्याची क्षमता असणे आवश्यक

ब) समुह किंवा संस्थेचे कार्य राज्य पातळीवर तसेच केंद्रस्तरावर सादर करण्याची क्षमता तसेच भागधारकांसोबत सादर करण्याची क्षमता

क) दैनंदिन कार्यक्रमात नवनविन कल्पना, योजना इ. अंमलात आणण्याची क्षमता

ड) सातत्याने प्रवास करण्याची इच्छा शक्ती व क्षमता असावी.

इ) सुसंवाद आणि व्यवस्थापन कौशल्य, तसेच दिलेल्या वेळेत काम पूर्ण करण्याची क्षमता असणे आवश्यक

ई) संगठन क्षमता व त्यांचेकडून कार्य करवून घेण्याची क्षमता

फ) एम.एस.ऑफीस/ इंटरनेट इ.वर चांगली पकड असणे आवश्यक

ग) संवाद कौशल्य (इंग्रजी/हिंदी व स्थानिक संबंधित) तसेच सदर भाषेत लिहीणे.

राज्यस्तरीय नोडल ऑफीसर - तंबाखू नियंत्रण व नियमन त्यांचे अधिपत्याखाली काम करणे अपेक्षित.

कार्यविवरण :-

अ) कायदा विषयक सल्लागारांनी राज्य तंबाखु व तंबाखूजन्य पदार्थाचे नियंत्रण कक्षाला मदत करणे तसेच कायदे विषय बाबी आणि पॉलीसी (धोरणात्मक बाबीं) च्या परिणामकारण अंमलबजावणीसाठी मदत करणे तसेच तंबाखु नियंत्रण विषयक विविध कायदेशिर बाबींची माहिती देऊन त्यांची अंमलबजावणी करावी.

ब) त्यांनी स्वतःहून सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करुन तसेच न्यायालयीन व प्रलंबीत केसेसचे बाबतीत सिव्हीअर कौंसीअल त्याबाबत माहिती द्यावी.

क) विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये उत्तरांचा मसुदा तयार करणे तसेच तंबाखु नियंत्रण बाबत माहितीच्या अधिकारातील प्रकरणांचा निपटारा करण्यास मदत करावी.

ड) कायदेशीर बाबींची एनजीओ व इतरांना माहिती देण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करावे.

इ) नविन केसेस तसेच प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करणे तसेच, कोर्टामध्ये सदरच्या सुनावणीबाबत यथोचित कार्यवाही करणेसाठी वेळेत आणि यथोचित कार्यवाही होत आहे याची दक्षता घ्यावी.

ई) तंबाखु नियंत्रण व नियमन कायद्यानुसार यथोचित कार्यवाही होत असल्यास त्याची माहिती संबंधितांना देणे.

फ) यासाठी नागरी सहकारी संस्था, शहरी भागातील विविध संस्था/संगठन इ.च्या माध्यमातून/ सहकार्याने विविध भागात नेटवर्क तयार करुन तंबाखु नियमन व नियंत्रणासाठी परिणामकारक धोरण तयार करण्यात यावे.

ह) याशिवाय पर्यवेक्षकांनी दिलेल्या अन्य आवश्यक अन्यबाबी/ कार्य/ जबाबदाऱ्या इ.

राज्य सल्लागार

पदसंख्या - प्रत्येक राज्यात एक

मानधन - रु.४५०००/-

शैक्षणिक योग्यता, अनुभव व कार्यानूसार वार्षिक वेतनवाढ

कंत्राटी कालावधी - राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष STCC (State Taboco Control Cell) येथे

कार्यालय – State Nodal Officer for Tobacco contro in th Department of Health $ Directorate of Health

राज्य सल्लागार

राज्यस्तरीय - तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ संनियंत्रण कक्ष संचालनालय, आरोग्य सेवा, मुंबई

**परिशिष्ठ –३**

**तिमाही अहवाल स्वरुप ( STCC to NTCC )**

**राज्य तंबाखु नियत्रण कक्षः..............**

**तिमाही समाप्ती अहवालः...............**

**भाग–अ**

| अ.क्र. | उपक्रम | होय/नाही | नाही असल्यास कारण |
|---|---|---|---|
| | **राज्य** | | |
| १ | राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष स्थापीत करण्यात आले आहे काय | | |
| २ | राज्य कक्षामध्ये कर्मचारी भरतीची स्थिती<br>- राज्य सल्लागार<br>- कायदा (विधी) अधिकारी<br>- ईतर | | |
| ३ | अ) राज्यस्तरीय समन्वय समिती (SLCC) स्थापन करण्यात आली आहे काय? | | |
| | ब) कार्यरत गट (WG) ची स्थापना करण्यात आली आहे काय?<br>उत्तर होय असल्यास गटाची निर्मीती | | |
| ४ | COTPA आणि COTPA चे नियम अधिकृत राज्य वेबसाईटवर प्रदर्शित आहे काय ? | | |
| ५ | राज्याव्दारे COTPA अंतर्गत अतिरीक्त अधिकारी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सुचित करण्यात आले आहेत काय? | | |
| | राज्यस्तरावार COTPA साठी आव्हानात्मक यत्रनेची स्थापना करण्यात आली आहे काय? | | |
| | चलन पुस्तकांची छपाई करुन ती जिल्हांना पाठविण्यात आली आहेत काय? | | |
| | चालान रक्कम जमा करण्याकरीता नविन खाते उघडण्यात आले आहे काय | | |
| ६ | मासिक गुणे आढावा सभेमध्ये COTPA शी संबधित अनुपालन अहवाल अंतर्भाव करण्याकरीता राज्य सरकारने पत्र निर्गमित केले आहे काय. | | |
| ७. | उत्तर होय असल्यास जिल्हाकडुन मासिक अहवाल राज्य कक्षाला पाठविला जातो काय. | | |
| ८. | मागील आर्थिक वर्षाकरीता उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे काय. | | |
| ९. | मागील आर्थिक वर्षाकरीता खर्चाचे तपशील सादर करण्यात आले आहे काय. | | |

**भाग–ब**

| अ.क्र. | उपक्रम | चालु तिमाहीमध्ये | चालु आर्थिक वर्षातील मागील तिमाही पर्यत |
|---|---|---|---|
| १. | SLCC सभांची संख्या व तारीख<br>कार्यरत गटांची सभांची संख्या व तारीख | | |
| २. | राज्यस्तरीय समर्थन कार्यशाळा आयोजित करण्यात आले आहे काय. | | |
| | उत्तर होय असल्यास अहवाल सोबत जोडावा. | | |
| ३. | प्रशिक्षकाचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे काय.<br>उत्तर होय असल्यास अहवाल सोबत जोडावा. | | |
| ४. | तंबाखु बंदीसाठी आरोग्य सेवा प्रदात्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम<br>उत्तर होय असल्यास अहवाल सोबत जोडावा. | | |
| | तंबाखु बंदीसाठी आरोग्य सेवा प्रदात्यांचे प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये | | |
| ५. | रुपांतरीत किंवा विकसीत IEC साहित्याचे प्रकार (पोष्टर/स्टिकर/हॅडआऊट /भिंतीचित्रे/फलक इ.) | | |
| | प्रसारीत केलेल्या प्रसारीत केलेल्या विविध IEC साहित्याचे नमुने | | |
| | अन्य स्वास्थ मोहिमेअंतर्गत तंबाखु नियत्रण संबधि दिलेल्या सुचना | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | अन्य संबधित राज्य सरकारी विभागांशी झालेल्या संभाचे तपशील. | | |
| | HTCC ने सहभाग घेतलेल्या अन्य विभागामधिल प्रशिक्षण कार्यक्रमाचे तपश्लील | | |
| ७. | अन्य नागरीक संघटना व व्यावसायीक संस्था(NGOs, NSS, NCC, IDA, IMA etc) सोबत झालेल्या सभेचे तपशील. | | |
| | | | |
| ८. | राज्यात स्थापीत करण्यात आलेले DTCCF | | |
| | DTT मधिल भरती कर्मचारी | | |
| ९. | जिल्हास्तरीय समन्वय समिती झालेले जिल्हे | | |
| | ज्या जिल्हामध्ये समन्वय समितीची सभा घेण्यात आली. ती जिल्हांची नावे | | |
| | जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या सभांची एकुण सभा | | |
| १०. | COTPA अंतर्गत अंमलबजावणी पथकची स्थापना करण्यात आलेले जिल्हाची नावे | | |
| | अंमलबजावणी पथकने दिलेल्या भेटी | | |
| | चलान करण्यात आलेल्या व्यक्तीची नावे व जमा झालेली रक्कम (ही माहिती मासिक स्वरुपात देण्यात यावी.) | | |
| | राष्ट्रिय हेल्पलाईनव्दारे उल्लघन करण्यात आलेल्या तक्रारींचा तपशील | | |
| | वरील तक्रारीवर घेतलेल्या कारावाहीचे तपशील | | |
| ११. | जिल्हा कक्षाव्दारे विविध भागीधाराकरीता आयोजित प्रशिक्षण/संवेदीकरण कार्यक्रम | | |
| | जिल्हास्तरीय प्रशिक्षण/संवेदीकरण कार्यक्रमामधील सहभागी | | |
| १२. | DTCC व्दारा रुपांतरीत किंवा विकसीत IEC साहित्याचे प्रकार (पोष्टर/स्टिकर/हॅडआऊट /भिंतीचित्रे/फलक इ.) | | |
| | IEC साहित्य प्रदर्शित केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र समुदाय आरोग्य केंद्र, सरकारी ईमारत, शाळा व ईतर सार्वजनिक स्थाने | | |
| १३. | जिल्हा कक्षाव्दारे आयोजित शालेय कार्यक्रमाअंतर्गत सहभागी शाळा<br>१)सार्वजनिक शाळा २)खाजगी शाळा ३) कोचिग शाळा | | |
| | शालेय कार्यक्रमाअंतर्गत सहभागी मुलांचा तपशील | | |
| | शालेय कार्यक्रमाचे तपशील | | |
| १४. | तंबाखु बंदी केंद्राची (TCC) स्थापना झालेल्या जिल्हांची नावे व एकुण संख्या | | |
| | जिल्हामधिल स्थापित तंबाखु बंदी केंद्राचे (TCC) तपशील (जिल्हा रुग्णालय, ईतर सरकारी सेटप , NGO, खाजगी सेटप करीता स्वतत्र तपशील देण्यात यावा.) | | |
| | अ) TCC मधिल कर्मचारी भरतीची स्थिती | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) TCC मधिल सल्लागारांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे काय. (एकुण सल्लागार व प्रशिक्षीत सल्लागारांची संख्या | | |
| | क)आरोग्य सेवा प्रदात्याकरीता TCC व्दारे तंबाखु बंदी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे काय?<br>उत्तर होय असल्यास एकुण प्रशिक्षण कार्यक्रमाची संख्या व तपशील | | |
| | ड)तंबाखु परावलंबनकरीता औषधोपचार उपलब्ध आहेत काय? | | |
| | इ) कार्बन मोनोक्साईड मॉनीटर व स्पायरोमीटर सारखी उपकरणे खरेदी करण्यात आली आहे काय. | | |
| | फ) TCC मधील सेवांचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींची संख्या<br>१) समुपदेशन मिळालेल्या व्यक्तींची संख्या<br>२)औषधोपचार मिळालेल्या व्यक्तींची संख्या<br>३) समुपदेशन व औषधोपचार मिळालेल्या व्यक्तींची संख्या | | |
| १५. | राज्य व जिल्हा स्तरावर राबविण्यात आलेल्या उल्लेखनिय /महत्वाचा पुढाकार/उपक्रमांचा तपशील ( NON NTCP जिल्हामधिल लेखे) | | |

**भाग–क**

**राज्य तंबाखु नियत्रण कक्ष खर्चाचे तपशील आहे.**

| अ. क्र. | अर्थसंकल्पीय लेखाशिर्षे | प्रारभिक शिल्लक | प्राप्त झालेला निधी | एकुण उपलब्ध निधी | खर्च | उर्वरीत शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | राज्य सल्लागार वेतन रु. ५५०००/– प्रती महिना | | | | | |
| | कायदा सल्लागार वेतन ४५,०००/– प्रती महिना | | | | | |
| २. | IED /समर्थन मोहिम | | | | | |
| ३. | महत्वाच्या भागीदारांचे प्रशिक्षण | | | | | |
| ४. | पलेक्झीबल पुल | | | | | |
| ५. | हालचालीकरीता रु. २५,०००/– | | | | | |
| ६. | कार्यालय स्थापनेकरीता मिळालेला अनुदान | | | | | |
| ७. | कमावलेला बॅक कर (जमा असल्यास) | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | | | | |

भाग अ व भाग ब अंतर्गत STCC व्दारा ईतर विभाग/ कार्यक्रमाशी संलग्नीत उपक्रमांचे विवरण देण्यात यावे

सहि व शिक्का
राज्य नोडल अधिकारी

**तिमाही अहवाल स्वरुप ( DTCC ते HTCC )**

**जिल्हा तंबाखु नियत्रण कक्षः..............**

**तिमाही समाप्ती अहवालः...............**

**भाग–अ**

| **अ.क्र.** | **उपक्रम** | **होय/नाही** | **नाही असल्यास कारण** |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तंबाखु नियंत्रण कक्ष स्थापीत करण्यात आले आहे काय? | | |
| | तबांखु बंदी केंद्र स्थापित करण्यात आले आहे काय. (उपकरणांच्या खरेदीसह) | | |
| २ | जिल्हा कक्षामध्ये कर्मचारी भरतीची स्थिती<br>– जिल्हा सल्लागार<br>– मानसशास्त्रज्ञ/ सल्लागार<br>– सामाजिक कार्यकर्ता<br>– ईतर | | |
| ३ | जिल्हा स्तरीय समन्वय समिती (SLCC) स्थापन करण्यात आली आहे काय? | | |
| | ब) कार्यरत गट (WG) ची स्थापना करण्यात आली आहे काय?<br>उत्तर होय असल्यास गटाची निर्मीती | | |
| ४ | COTPA आणि COTPA चे नियम अधिकृत जिल्हा कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रदर्शित आहे काय | | |
| ५. | जिल्हास्तरावार COTPA साठी आव्हानात्मक यत्रनेची स्थापना करण्यात आली आहे काय? | | |
| | चालान रक्कमसाठी वेगळे लेखाशिर्षक तयार करण्यात आले आहेत काय. | | |
| | (STCC) कडुन चलन पुस्तक प्राप्त झाली आहे काय. | | |
| | चलन पुस्तक अधिकृत अधिकाऱ्यांना पाठविण्यात आली आहेत काय? | | |
| | COTPA अंतर्गत अंमलबजावणी पथकची स्थापना करण्यात आली आहे काय. | | |
| | मासिक गुणे आढावा सभेमध्ये COTPA शी संबधित | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अनुपालन अहवाल अंतर्भाव करण्यात आले काय. | | |
| ६. | मागील आर्थिक वर्षाकरीता उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे काय. | | |
| ७. | मागील आर्थिक वर्षाकरीता खर्चाचे तपशील सादर करण्यात आले आहे काय. | | |

## भाग–ब

| अ.क्र. | उपक्रम | चलु तिमाहीमध्ये | चालु आर्थिक वर्षातील मागील तिमाही पर्यत |
|---|---|---|---|
| १. | DLCC सभांची संख्या व तारीख | | |
| २. | अंमलबजावणी पथकने दिलेल्या भेटी | | |
| | चालान करण्यात आलेल्या व्यक्तीची नावे व जमा झालेली रक्कम (ही माहिती) मासिक स्वरुपात देण्यात यावी. | | |
| | राष्ट्रिय उल्लघन हेल्पलाईनव्दारे करण्यात आलेल्या तक्रारींचा तपशील | | |
| | वरील तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचे तपशील | | |
| ३. | DTCC व्दारे विविध भागीधाराकरीता आयोजित प्रशिक्षण/संवेदीकरण कार्यक्रम | | |
| | प्रशिक्षण/संवेदीकरण कार्यक्रमामधील सहभागी | | |
| ४. | DTCC व्दारे रुपांतरीत किंवा विकसीत IEC साहित्याचे प्रकार (पोष्टर/स्टिकर/हॅडआऊट /भिंतीचित्रे/फलक इ.) | | |
| | IEC साहित्य प्रदर्शित केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र समुदाय आरोग्य केंद्र, सरकारी ईमारत, शाळा व ईतर सार्वजनिक स्थाने | | |
| ५. | DTCC व्दारे कक्षाव्दारे आयोजित शालेय कार्यक्रमाअंतर्गत सहभागी शाळा<br>१)सार्वजनिक शाळा २)खाजगी शाळा ३) कोचिग शाळा | | |
| | शालेय कार्यक्रमाअंतर्गत सहभागी मुलांचा तपशील | | |
| | शालेय कार्यक्रमाचे तपशील | | |
| ६. | अन्य संबधित राज्य सरकारी विभागांशी झालेल्या संभाचे तपशील. | | |
| | DTCC ने सहभाग घेतलेल्या अन्य विभागामधिल प्रशिक्षण कार्यक्रमाचे तपशील | | |
| ७. | अन्य नागरीक संघटना व व्यावसायीक संस्था (NGOs, NSS ,NCC, IDA, IMA etc) सोबत झालेल्या सभेचे तपशील | | |
| ८. | ब्लॉक स्तरीय समन्वय समिती स्थापित झालेल्या ब्लॉकची एकुण संख्या | | |
| | ग्रामीण स्तरीय समिती स्थापीत झालेल्या गावांची एकुण संख्या. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | जिल्हामधिल स्थापित तंबाखु बंदी केंद्राचे (TCC) तपशील (जिल्हा रुग्णालय, ईतर सरकारी सेटप, NGO, खाजगी सेटप करीता स्वतत्र तपशील देण्यात यावा.) | | |
| | अ) TCC मधिल कर्मचारी भरतीची स्थिती | | |
| | ब) TCC मधिल सल्लागारांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे काय. (एकुण सल्लागार व प्रशिक्षीत सल्लागारांची संख्या | | |
| | क)आरोग्य सेवा प्रदात्याकरीता TCC व्दारे तंबाखु बंदी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे काय?<br>उत्तर होय असल्यास एकुण प्रशिक्षण कार्यक्रमाची संख्या व तपशील | | |
| | ड)तंबाखु परावलंबन करीता औषधोपचार उपलब्ध आहेत काय? | | |
| | इ) कार्बन मोनोक्साईड मॉनीटर व स्पायरोमीटर सारखी उपकरणे खरेदी करण्यात आली आहे काय. | | |
| | फ) TCC मधील सेवांचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींची संख्या<br>१) समुपदेशन मिळालेल्या व्यक्तींची संख्या<br>२) औषधोपचार मिळालेल्या व्यक्तींची संख्या<br>३) समुपदेशन व औषधोपचार मिळालेल्या व्यक्तींची संख्या | | |

# विभाग –क
# खर्चाचे विवरण

| अ.क्र. | अर्थसंकल्पीय बाब | सुरुवातीची शिल्लक | प्राप्त अनुदान दिनांक निहाय | एकुण उपलब्ध अनुदान | खर्च | अखेरची शिल्लक आज पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | DTCC | | | |
| १ | **कर्मचाऱ्यांचे मानधन** | | | | | |
| २ | **प्रशिक्षण/**<br>जिल्हा स्तरीय प्रशिक्षण/ उजळणी कार्यक्रम प्रशिक्षण | | | | | |
| | तंबाखू सोडण्यास आरोग्याची काळजी घेण्याऱ्याचे प्रशिक्षण | | | | | |
| | इतर | | | | | |
| ३ | महिती शिक्षण संदेश मा. शिक्षण स साहित्य भिंतीपत्रक/घडीपत्रीका | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | होर्डींग्स इ. | | | | | |
| | इतर | | | | | |
| ४ | **शालेय कार्यक्रम** शाळेत जनजागृतीवर कार्यक्रमाचे आयोजन | | | | | |
| | इतर | | | | | |
| ५ | **पर्यवेक्षण** अंमलबजावणी करणाऱ्या तुकडया आणि संबंधित खर्चाचे पर्यवेक्षण | | | | | |
| | इतर | | | | | |
| ६ | **औषधांवरील उपचार** औषधे विषयक साधने आणि संबंधित खर्च | | | | | |
| ७ | **लवचिक प्लेक्झीफुल** | | | | | |
| ८ | **संसाधन/ पायाभुत सुविधा** कार्यालयाकरीता प्राप्त अनुदान (कम्प्युटर, प्रिंटरसह, संबंधित सुटेभाग | | | | | |
| ९ | बॅकेद्वारे प्राप्त व्याज इतर | | | | | |
| | एकुण | | | | | |
| **TCC** | | | | | | |
| १ | **कर्मचाऱ्यांचे मानधन** | | | | | |
| २ | **पायाभुत सुविधा साधनांच्या** उपलब्धतेसाठी प्राप्त अनुदान | | | | | |
| ३ | **संस्थेबाहेरील प्रशिक्षण** | | | | | |
| ४ | **आकस्मिक खर्च** | | | | | |
| ५ | **प्राप्त बॅक व्याज** (असल्यास) | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | | | | |

* जर जिल्हा प्रशिक्षण पथक यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता इतर विभागाचे सहकार्य घेतल्यास भाग अ व भाग ब प्रपत्रात नमुद करावे.

स्वाक्षरी व शिक्का
जिल्हा नोडल अधिकारी

जोडपत्र-४

# उपयोगिता प्रमाणपत्र
## कालावधी .....
## (द्वारा राज्य प्रशिक्षण केंद्र)

१. प्रमाणित करण्यात येते की, चालू वर्षाकरीता मंजुर अनुदान रु. ............ राज्य आरोग्य सोसायटी रु............. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय द्वारा मंजुर नं. ........ PH-1 दिनांक ............ आणि रु. .... अखर्चित शिल्लक एकुण मंजुर अनुदान आदेश नं. .... दिनांक ........ रु. ........... चालु वर्षातील प्राप्त व्याज, एकुण बेरीज रु........ यापैकी वेगवेगळया बाबींवरील मंजुर अनुदान भारत सरकार राष्ट्रीय तंबाखु नियत्रंण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता मंजुर असलेले शिल्लक रु....... वर्षा अखेर अखर्चित रक्कम ........... पुढील वर्षा करीता इतर बाबींवर केलेला खर्च

२. कोणत्या शिर्ष/बाब अंतर्गत अनुदान देण्यात आले. (मंत्रालयाचे कृपया मंजुर अनुदानाचे पत्र जोडावे.)

३. प्रमाणित करतो की, ज्या करीता मंजुर अनुदान दिलेले होते ते योग्य रित्या पुर्णपणे उपयोगात आणले आणि ते मी दिलेल्या चेकलिस्ट प्रमाणे खरोखर खर्च केलेला आहे. मी समाधानी आहे.

चेक विषयक

खर्चाचे वार्षीक ऑडीट विवरण आणि उपयोगिता प्रमाणपत्र जे राज्य/ जिल्हा मध्यवर्ती अधिकारी (तंबाखु नियत्रंण) यांच्याद्वारे पुरविले आहे.

स्वाक्षरी व शिक्का
जिल्हा नोडल अधिकारी

# जिल्हा तंबाखु नियत्रंण कक्ष (सेल)

जिल्हा आरोग्य सोसायटी च्या अंब्रेला प्रणाली अंतर्गत जिल्हा तंबाखु नियत्रंण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा आरोग्य सोसायटीच्या व्यवस्थापनाकरीता जिल्हा अधिकाऱ्यांकडुन अधिकार बहाल केले आहे. राष्ट्रीय तंबांखु नियंत्रण कार्य अंतर्गत जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावर मध्यवर्ती मुदयावर सर्व कार्य पार पाडले जाणार आहे. ते या कार्यक्रमा अंतर्गत संपूर्ण नियोजन अंमलबजावणी आणि पर्यवेक्षण या वेगवेगळया कृतींसाठी आणि भौतिक व आर्थिक उद्‌दिष्ट पूर्ण करण्यास जबाबदार राहिल. DTCC ची भुमिका जास्तीत जास्त बाबींची अंमलबजावणी NTCP अंतर्गत जिल्हा उपजिल्हा स्तरावर केली जाईल.

**जिल्हा स्तरीय मुख्य कार्य Activities**

अ) मुख्य सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण :- आरोग्य आणि सामाजिक कार्यकर्ते, अशासकीय संस्था, शालेय शिक्षक, अंमलबजावणी करणारे अधिकारी इ.

ब) माहिती शिक्षण व संप्रेषण कार्य

क) शालेय कार्यक्रम

ड) तंबाखू नियत्रंण कायद्याचे पर्यवेक्षण

इ) तंबाखू थांबविणेच्या सुविधांची तरतूद औषधांचे उपचार च्या सुविधाचे व्यवस्थापण आणि बळकटीकरण जिल्हा स्तरावर केले जाईल.

फ) पंचायतराज सदस्यांच्या समन्वयानी तंबाखु नियत्रंण ही संकल्पना शेवटच्या घटकांपर्यंत रुजविणे.

जिल्हा तंबाखु नियंत्रण कक्षाचे मुख्य हे प्रामुख्याने जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा शल्यचिकित्सक हे पूर्ण वेळ जिल्हा नोडल ऑफीसर राहतील. जिल्हा नोडल ऑफीसरला असंसर्गजन्य आजारांचे जसे कॅन्सर, मधुमेह, हृदयरोग आणि स्ट्रोक या आजारांचे प्रतिबंध आणि नियत्रंण करण्यास एकजुटीने प्रयत्न करणे. राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम आणि आरोग्याच्या काळजीकरीता वृध्दांच्या आरोग्याची काळजी घेण्यास राष्ट्रीय कार्यक्रम या कक्षाचे इतर सदस्य जसे जिल्हा सल्लागार, मानसशास्त्र, समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्ता यांची राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कक्षांतर्गत कंत्राअी पध्दतीने निवड केली जाईल. प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी/जिल्हा मजीस्ट्रेट यांच्या नियत्रंणाखाली कार्यक्रमाच्या घटनेची अधिक चांगल्या

रितीने अंमलबजावणी करतील. हा तयार केलेला गट अहवाल संकलन, एकत्रीकरण, पर्यवेक्षण तसेच अहवाल तंबाखु नियत्रंण कायद्याचे उल्लघंन करण्याऱ्यांवर कार्यवाही करण्यास जबाबदार राहतील.

**जिल्हा स्तरीय समन्वय समिती**

प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा स्तरीय समन्वय समिती तयार करण्यात यावी. याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किंवा जिल्हा मॅजिस्ट्रेट हे राहतील. जि. नोडल ऑफिसर हे मेम्बर सदस्य सचिव राहतील आणि ते समितीची नियीमत सभा आयोजित करतील.

| अ.क्र. | विभाग/अधिकारी | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | मुख्य वैद्यकीय अधिकारी मेम्बर सेक्रेटरी | • नोडल ऑफीसर मिटींगचे आयोजन करणे<br>• नियमित मॉनिटरींग आढावा आणि जि.तं.नि. कार्यक्रमाचे पर्यवेक्षण |
| २ | पोलिस अधिक्षक | • अंमलबजावणी गट तयार करणे<br>• COTPA अंतर्गत अंमलबजावणी आणि सुचना, पर्यवेक्षण उपलब्ध करुन देणे.<br>• कायद्याचा उल्लंघन करण्याऱ्यांची मासिक क्राईम मिटींगमध्ये आढावा घ्यावा. |
| ३ | जिल्हा शिक्षण अधिकारी | • तंबाखू मुक्त शैक्षणिक संस्थाच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करणे.<br>• तंबाखु नियत्रंण कायदा (COTPA) अंतर्गत सेक्शन २ (कलम) व ६ चे सुचनांचे एकत्रीकरण करणे.<br>• ग्रामीण आणि शहरी भागात शालेय विद्यार्थ्यांद्वारा शाळेत आणि सामाजिक स्तरावर जनजागृती कार्यक्रम घेणे. |
